## ऋतिक गायकवाड



ऋतिक सोलापूर शहरापासून अगदी जवळच एका गावामध्ये राहतो. ऋतिकचे आई-वडील आणि भाऊ मजुरीच्या कामाला जातात. ऋतिकने नुकतेच शिक्षण पूर्ण केले. घरातील आर्थिक अडचणीमुळे ऋतिकला काम करणे गरजेचे होते. ऋतिकने एका गॅरेजवर कामाला सुरुवात केली. गॅरेजमधील काम तो शिकू लागला. ऋतिकला गॅरेज कामाचा जास्त अनुभव नसल्याने पगार कमी मिळत होता त्यामधून केवळ ऋतिकचा पॉकेट खर्च भागात होता.

ऋतिक गॅरेज कामासोबतच काहीतरी जोडधंदा करू इच्छित होता. गॅरेजमध्ये दुचाकी दुरुस्तीचे काम तो करत होता. चारचाकी गाडी गॅरेजमध्ये दुरुस्तीसाठी आल्यानंतर ऋतिकसह कोणालाच चारचाकीबाबत माहिती नसल्याने दुरुस्तीचे काम ते करत नसत. ऋतिक चारचाकी चालविण्याबाबतचे प्रशिक्षण घेऊ इच्छित होता. चारचाकी चालविण्यास शिकल्यास हळू हळू दुरुस्तीचे काम देखील करण्यास सुरुवात करू इच्छित होता.

ऋतिकला त्याच्या मित्राकडून वात्सल्य ट्रस्ट मुंबई सारथी युथ फौंडेशनच्यावतीने चारचाकी वाहन चालविण्याचे प्रशिक्षण दिले जाणार असल्याची माहिती मिळाली. ऋतिकने सारथी युथ फौंडेशनशी संपर्क साधून प्रशिक्षणामध्ये सहभाग घेतला. पूर्णवेळ प्रशिक्षण केले.

सध्या चारचाकी वाहन चालवता येत असल्याने छोटे-छोटे दुरुस्तीचे काम देखील करू लागला आहे. वात्सल्य ट्रस्ट मुंबई सारथी युथ फौंडेशनच्या चारचाकी वाहन चालविण्याच्या प्रशिक्षणामुळे रोजगारची नवीन वाट मिळाल्याचे ऋतिक सांगतो. धन्यवाद वात्सल्य ट्रस्ट मुंबई सारथी युथ फौंडेशन.


RS
ASHOK LEYLAND
MH.13.DQ.4145

